अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 17 जुलै 2025 | वर्ष 10 वे | अंक 50 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## करवाढीमुळे मद्यपी विदेशीकडून ‘देशी’कडे

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शासनाने विदेशी दारूच्या करामध्ये जबर वाढ केल्यामुळे विदेशी दारूच्या किमती प्रतिक्वार्टर ५० ते २०० रुपयांनी वाढल्या आहेत. या वाढीव किमती परवडत नसल्याने अनेक तळीरामांनी आपला मोर्चा ‘देशी’ दारूकडे वळविल्याचे दिसत आहे.

**जबरदस्त करवाढ !**

शासनाने गेल्या महिन्यात देशी, भारतीय बनावटीची विदेशी आणि विदेशी दारूवर १० टक्के व्हॅट, १५ टक्के परवाना शुल्क आणि ९ ते ७० टक्के जादा उत्पादन शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने नवीन दर हा दारूचा नवीन एमआरपीनुसारचा स्टॉक बाजारात आल्यानंतर लागू करण्याचा निर्णय घेतला होता; पण राज्यातील अनेक बार चालकांनी शासनाचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अवघ्या दोन-चार दिवसांतच नवीन कर रचनेनुसार दर आकारण्यास सुरुवात केली आहे. जुना स्टॉकही नवीन दरानेच विकणे सुरू केले आहे. कोणत्या ब्रॅन्डची किमत किती असणार, हे निश्चित नसतानाच अनेक ठिकाणी हे नवीन दर लागू करण्यात



आले आहेत.

**बारमधील विक्री घटली !**

परिणामी अनेक बारमध्ये भारतीय बनावटीच्या विदेशी दारूच्या किमती ५० ते २०० रुपयांपर्यंत वाढलेल्या आहेत. ही वाढीव किंमत अगदी गब्बर तळीरामांच्या खिशालासुद्धा परवडेनाशी झाली आहे. त्यामुळे अनेक तळीरामांनी आपला ‘कोटा’ कमी केलेला दिसत आहे, कुणी महागडे ब्रॅन्ड टाळून ‘स्वस्तात मस्त’ ब्रॅन्डला पसंती देत आहेत, तर कुणी ‘दररोजचं अधिवेशन’ आता ‘साप्ताहिक’ करून टाकलेले दिसत आहे. बारमधील मित्रामित्रांच्या मैफिलीही कमी झालेल्या दिसत आहेत. काहीजण वारमधील दर परवडत नसल्याने वाईन शॉपमधून दारूची खरेदी करताना दिसत आहेत. या सगळ्याचा परिणाम म्हणून बारमधील भारतीय बनावटीच्या विदेशी दारूचा खप जवळपास ४० टक्क्यांनी कमी होत असल्याचा दावा काही बार चालकांनी केलेला आहे.

**स्व‘देशी’ ओढा !**

विदेशी दारूच्या किमती आवाक्याबाहेर गेल्याने अनेक पट्टीच्या तळीरामांनी ‘देशी’चा आसरा घेतल्याचे दिसत आहे. एकतर देशी दारूच्या किमतीत केवळ १० रुपयांनी वाढ झाली आहे. दुसरे म्हणजे गेल्या काही वर्षात देशी दारू उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी वेगवेगळ्या चवीचे आणि वासाचे अनेक बैंड बाजारात आणले आहेत. यापैकी काही ब्रॅन्डची तर विदेशी ब्रॅन्डशीही

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## संभाजी ब्रिगेडचे गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

ब्रम्हपुरी/का.प्र.

संभाजी ब्रिगेडचे ज्येष्ठ नेते आणि सामाजिक कार्यकर्ते प्रविणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे १३ जुलै २०२५ रोजी झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ ब्रम्हपुरीतील संभाजी ब्रिगेडसह विविध पुरोगामी संघटनांनी एकत्र येत उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले.



अक्कलकोट येथे पुरस्कार वितरण समारंभात सहभागी होण्यासाठी गेलेल्या गायकवाड यांच्यावर दीपक सीताराम काटे आणि त्याच्या साथीदारांनी पूर्वनियोजितपणे शाईफेक करून हल्ला केला. या घटनेमुळे राज्यभरात संतापाची लाट पसरली आहे. गेल्या काही महिन्यांपासून गायकवाड यांना धमक्या दिल्या जात होत्या. ‘संभाजी ब्रिगेड संघटनेचे नाव बदला अन्यथा घरात घुसून मारू,’ अशा धमक्या देणाऱ्या गुन्हेगारांवर अद्यापही कोणतीही कारवाई न झाल्याने संघटनांनी रोष व्यक्त केला.

निवेदनात नमूद करण्यात आले की, दीपक काटे याचे अनेक गुन्हेगारी प्रकरणांशी संबंध असून पुणे विमानतळावर त्याच्याकडून रिव्हॉल्वर आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली होती. तसेच इतर गुन्ह्यांमध्येही त्याचे नाव आहे. अशा व्यक्तीला राजकीय संरक्षण मिळत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

या हल्ल्याला ‘शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर विचारांवर हल्ला’ असे संबोधित करत, संभाजी ब्रिगेडसह समविचारी संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला. ‘आम्ही कायद्यावर विश्वास ठेवतो, परंतु त्याचा अर्थ अन्याय सहन करणे असा होत नाही. आता वेळ आली आहे, आम्ही जशास तसे उत्तर देऊ,’ असा इशाराही निवेदनात देण्यात आला. ‘हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नाही, तर तो पुरोगामी विचारसरणी, सामाजिक चळवळ, आणि बहुजन अस्मितेवर आहे,’ असे म्हणत या घटनेला सरकारपुरस्कृत दहशतवाद ठरवत संघटनांनी फडणवीस सरकारवर तीव्र टीका केली.

या प्रसंगी ब्रम्हपुरीतील विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पानठेल्याची जाळपोळ करणाऱ्या युवकांना अटक

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील पारडगाव फाट्यावरील विष्णू खुशाल घोरमोडे यांच्या मालकीच्या हॉटेल व पानटपरीची जाळपोळ करण्यात आली होती. याप्रकरणी ब्रह्मपुरी पोलिसांनी दोन आरोपीना अटक केली आहे.

नीलेश ढोरे (२२) विनय मेश्राम (२८), रा. पारडगाव, असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. ब्रह्मपुरी-आरमोरी मार्गावरील पारडगाव फाट्यावरील विष्णू खुशाल घोरमोडे यांच्या मालकीच्या हॉटेलची २६ जून रोजी रात्रीच्या सुमारास जाळपोळ करण्यात आली होती. या आगीत पानटपरीतील साहित्य जाळून खाक झाले होते. याप्रकरणी विष्णू घोरमोडे यांनी पोलिसांत तक्रार केली होती ब्रह्मपुरी पोलिसांनी अपराध क्रमांक २७८/२०२५ कलम ३ २६ (जी) भारतीय न्याय संहिता २०२३ अनाये अज्ञात

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# शिक्षक, पालकांना संयमाची गरज

नुकतीच गुरुपौर्णिमा सर्वत्र साजरी झाली. आपल्या जीवनात गुरूचे स्थान फार महत्त्वाचे आणि मोठे आहे. आई ही आपली प्रथम गुरू. त्यानंतर शाळेतील शिक्षकांना आपण गुरुजन म्हणतो. हे दोन्ही गुरू आपल्याला चांगले जीवन कसे जगावे ते शिकवितात. मोठ्यांचा आदर करावा. सर्वांशी प्रेमाने व मिळून मिसळून वागावे. देवाला सकाळ, संध्याकाळ नमस्कार करावा. इत्यादी नित्यक्रमातून आई आपल्यावर चांगले संस्कार करीत असते. शाळेत गुरुजी अभ्यास कसा करावा. परीक्षेत चांगले गुण मिळण्यासाठी काय केले पाहिजे, हे शिकवून राष्ट्राची उत्तम भावी पिढी घडविण्याचे काम करीत असतात.

हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे, मागच्या आठवड्यात बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील वसाडी बु. या गावातील एका १५ वर्षीय विद्यार्थ्यांने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविली. शिक्षकाने आपल्या आई-वडिलांचा केलेला अपमान सहन न झाल्याने आपण हे टोकाचे पाऊल उचलल्याचे त्याने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमूद केले आहे. त्यावरून त्या शिक्षकाला लोकांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण एवढी जबर होती की, त्या शिक्षकाला मरणासन्न स्थितीत रुग्णालयातील अतिदक्षता कक्षात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेने मन सुन्न झाले. आजची मुलं एवढी संवेदनशील आहेत की, त्यांना थेट आत्महत्येशिवाय दुसरा पर्यायच दिसत नाही. या सर्व प्रश्नांनी मनात काहूर माजविले. पूर्वी शाळेत पहिल्या वर्गात मुलांना घालतांना पालक गुरूजींना सांगायचे, गुरुजी याला चांगला तयार करा आले नाही तर, नि:संकोच झोडपा त्यामुळे शाळेत गुरुजींनी छडीचा मार दिला तर घरी सांगण्याची सोय नव्हती. कारण, सांगितले तर घरी देखील मार मिळण्याची भीती होती. त्यामुळे गुरुजींनी शिक्षा केली तरी चुपचाप सहन करण्यापलीकडे दुसरा मार्ग नव्हता. मात्र, आजकाल पालकच आपल्या पाल्यांचे खूप लाड पुरवितात. शाळेत शिक्षकाने रागावले व विद्यार्थ्याने घरी जाऊन पालकांना सांगितले की, लगेच दुसऱ्या दिवशी पालक शाळेत जाऊन त्या शिक्षकाशी विद्यार्थ्यासमोरच वाद घालतात. वास्तविक शिक्षक वर्गातील विद्यार्थ्यांवर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करतात. विद्यार्थ्यांवर शिक्षक प्रचंड मेहनत घेत असतात. विद्यार्थ्याने आपली चूक सुधारावी तसेच, वारंवार तीच ती चूक पुन्हा पुन्हा करू नये. वर्गात शिकविण्याकडे त्यांनी लक्ष द्यावे म्हणून प्रसंगी शिक्षक विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा करतात. मात्र, आपल्या पाल्याला कठोर शिक्षा करू नये म्हणून पालक शिक्षकांशी भांडतात, असे प्रसंग अलिकडे नेहमीच घडताना दिसतात.

विशेष म्हणजे पालक आणि शिक्षकांचे भांडण विद्यार्थ्यासमोरच होते. याचा विद्यार्थ्यावर वेगळाच परिणाम होतो आणि तो नंतर शिक्षकांचे अजिबातच ऐकत नाही. तेव्हा पालकांनी आपल्या पाल्याने शिक्षकाने मारले, रागावले, अशी तक्रार शाळेतून घरी आल्यावर केल्यास प्रथम आपल्या मुला-मुलीची काही चूक होती का? याची चौकशी केली पाहिजे. शिक्षकांनी विनाकारणच विद्यार्थ्याला शिक्षा केली असेल तर त्याची मुख्याध्यापकांकडे तक्रार करावी. आपल्या तक्रारीत तथ्य असल्यास मुख्याध्यापक त्या शिक्षकाला नक्कीच कडक समज देतील. त्याचप्रमाणे तावातावात थेट वर्गात जाऊन शिक्षकांशी वाद घालणे, धमकावणे इत्यादी प्रकार पालकांनी टाळले पाहिजेत. त्याप्रमाणे शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांना शिक्षा करताना विवेक बाळगावा. अनेकदा शिक्षक विद्यार्थ्याला बेदम मारतात. शिक्षकांनी हे सर्व टाळले पाहिजे. रागावताना देखील शब्दांचा जपून वापर केला पाहिजे. पहिली ते आठवी, नववीपर्यंतचे विद्यार्थी कोवळ्या आणि हळव्या मनाचे असतात. वर्गातील इतर मुलांसमोर त्यांचा झालेला अपमान त्यांच्या जिव्हारी लागतो आणि मग असे प्रसंग घडतात. मग, विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे म्हणून शिक्षकांनी शिक्षा करूच नये का? तर तसे नाही. शिक्षा करावी, रागवावे. पण, थोडा संयम ठेवून हे सर्व टाळण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांची चूक पालकांच्या लक्षात आणून द्यावी. विद्यार्थी अभ्यास करीत नसल्यास त्याच्याकडून घरी अभ्यास कसा करवून घ्यायचा याबाबत पालकांना सूचना द्याव्यात. असे केल्यास वसाडी बु. सारख्या घटना भविष्यात टाळता येऊ शकतात. वास्तविक पाहता कोणत्याही शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या पालकांचा अपमान करायचा नसतो आणि कोणीही तसे जाणीवपूर्वक करणार नाही. पण, त्या मुलांचे वयच चांगले वाईट समजण्याचे नसते. तेव्हा, भविष्यात वसाडीसारख्या घटना टाळण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी संयम आणि भान ठेवून वागले पाहिजे.

# नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयातील १९६ विद्यार्थीनींना सायकल वाटप



(विद्यार्थीनींना सायकलचे वाटप करतांना ने.हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सोबत मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम व इतर)

ब्रम्हपुरी/का.प्र.

सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५ ला ने.ही. कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे शासनाच्या मानव विकास योजनेअंतर्गत शाळेपासून पाच किमी अंतरावर राहत असणाऱ्या विद्यालयातील सुमारे १९६ विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप करण्यात आले.

सदर सायकल वितरण नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांच्या शुभहस्ते विद्यार्थिनींना सायकल वितरित करण्यात आले.

या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम यांचेसह सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तो बगीचा नसून पर्यावरणपूरक हरित पट्टा

## नागभीडच्या हिंदू स्मशानभूमीत न.प.द्वारे बगिचासदृश्य बांधकाम

नागभीड/प्रतिनिधी

नागभीडची हिंदू स्मशानभूमी ही नागभीड-करांकरीता श्रध्देचा विषय असुन या ठिकाणी धार्मिक भावना दुखावतील या पद्धतीचे कार्य नगरपरिषद प्रशासनाने करू नये, अशी मागणीवजा सुचना भाजपा नगर नागभीडच्या शिष्टमंडळाने नागभीड नगर परिषदच्या मुख्याधिकारी श्रीमती सोनम देशमुख यांच्याकडे केली आहे. तसेच काही जागरुक नागरिक , संस्था यांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देत सुरु असलेले काम त्वरीत थांबविण्याची मागणी केली.

या पार्श्वभूमीवर नागभीड नगरपरिषदचे माजी उपनगराध्यक्ष गणेश तर्वेकर व माजी बांधकाम सभापती सचिन आकुलवार यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी सोनम देशमुख यांची भेट घेत निवेदन दिले. या निवेदनात सध्या असलेली स्मशानभुमीची जागा कुणालाही हस्तांतरीत करू नये व त्या परिसरात बगीच्याच्या नावाखाली पक्के बांधकाम करू नये अशी भाजपाची भूमिका असल्याचे स्पष्ट करीत स्मशानभुमी परिसर सुंदर करण्यासाठी अधिकाधिक वृक्षारोपण करण्याची सुचना केली.

यावर 'बगीचा विकास ' या संभ्रमाबाबत न.प. मुख्याधिकारी श्रीमती सोनम देशमुख यांनी, भाजपा शिष्टमंडळासमोर या कामाचे ईस्टीमेट व नकाशे समोर दाखवून , शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत बगीच्याचे बांधकाम नसुन पर्यावरणपुरक हरीतपट्टा निर्माण करण्यासाठी वृक्षारोपण करणे व वृक्षसंवर्धानासाठी तसेच सुरक्षिततेसाठी तारफेन्सिंग चे काम त्यात समाविष्ट असल्याचे सांगितले. यात कुठलेही पक्के बांधकाम नसुन धार्मिक भावना दुखावतील असे कुठलेही कृत्य न.प. प्रशासनाकडुन होणार नाही याची ग्वाही दिली. या पद्धतीच्या हरीतपट्टूयाच्या निर्मितीसाठी पुन्हा निधी असुन वृक्षारोपण करण्यासाठी अन्य ठिकाणे शोधण्यात येणार असल्याचे न.प. मुख्याधिकाऱ्यांनी सांगीतले.

न.प. नागभीडला निवेदन देतेवेळी माजी जि.प.सदस्य संजय गजपुरे, माजी नगरसेवक संजय अमृतकर व रुपेश गायकवाड, भाजपा महिला आघाडी जिल्हा सरचिटणीस प्रिया लांबट, भाजपा नेते बंडुभाऊ गेडाम, रमेश ठाकरे, धनराज काटेखाये, मोजेस मरकाम, दिनेश समर्थ, पवन नागरे, संजय मालोदे, राजुभाऊ पिसे, गुड्डु भोयर, रवी देशमुख, संदीप गिरीपुंजे, मुजाहिद पठाण यांची उपस्थिती होती.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७९५३९५

**जल है तो कल है...**

## विनोदिनी

एक मिल्ट्री बेस में एक कर्नल साहब की पत्नी मास्क पहन, अपने कुत्ते के साथ टहल रही थी... तभी दो मिल्ट्री जवान उस सड़क से गुजरे तो उन्होंने कर्नल की पत्नी को जोरदार सैल्यूट किया... कर्नल की पत्नी बहुत खुश हुई...

लेकिन उसकी खुशी जल्द ही गायब हो गई जब उसने दोनों जवानों की बातें सुनीं...

पहले जवान ने दूसरे से पूछा : 'वो लेडी कौन है ? '

दूसरे ने जवाब दिया : 'पता नहीं यार, लेकिन कुत्ता कर्नल साहब का है...! इसलिए मैंने सॅलूट किया....!!!

# जिल्हा बास्केटबॉल संघटना व सन्मित्र क्रीडा मंडळाची संयुक्त सभा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशनला अखेर बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडिया कडून मान्यता प्राप्त झाली असून, याचा सकारात्मक परिणाम चंद्रपूर जिल्हा बास्केटबॉल संघटनेवर झाला आहे. राज्य संघटनेकडून पुन्हा एकदा जिल्हा संघटनेला मान्यता मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्हा बास्केटबॉल संघटना आणि सन्मित्र क्रीडा मंडळ ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने झाडे सेलिब्रेशन, आरमोरी रोड, ब्रम्हपुरी येथे एक विशेष सभा आयोजित करण्यात आली.



या वेळी महाराष्ट्र बास्केटबॉल असोसिएशनचे नवनियुक्त कार्यकारी सदस्य प्राचार्य डॉ. अश्विन चंदेल यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. देविदास जगनाडे (अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा बास्केटबॉल संघटना) होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अतुल देशकर (अध्यक्ष, सन्मित्र क्रीडा मंडळ, ब्रम्हपुरी), प्रा. उमेशचंद्र मिश्रा, पवन जयस्वाल, प्रा. संजय कुंभारे, प्रा. विजय दिघोरे, फारुख शेख, प्रा. रामटेके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय प्रा. प्रकाश आयदे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. यानंतर डॉ. चंदेल, डॉ. जगनाडे आणि प्रा. देशकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना डॉ. अश्विन चंदेल म्हणाले की, राज्य संघटनेला गेल्या काही वर्षांपासून मान्यता नसल्यामुळे जिल्हा संघटनेचे कामकाज थांबले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा खेळण्याच्या संधी मिळत नव्हत्या. नवीन मान्यतेमुळे जिल्ह्यात बास्केटबॉलचा विकास वेगाने होईल आणि विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रा. अतुल देशकर यांनी ब्रम्हपुरीतील बास्केटबॉल स्पर्धा पुन्हा सुरू करण्याचा संकल्प केला असून, डिसेंबरपर्यंत मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करण्याचे संकेत दिले. दोन नवे बास्केटबॉल कोर्ट तयार होत असून, याआधी राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू ब्रम्हपुरीत खेळले असल्याची आठवण त्यांनी करून दिली. अध्यक्षीय भाषणात डॉ. देविदास जगनाडे यांनी ब्रम्हपुरीचा बास्केटबॉलमधील ऐतिहासिक वारसा सांगत जिल्हा संघटनेच्या नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे सांगितले.

संचालन मनोज वठे यांनी केले. कार्यक्रमात पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बास्केटबॉलप्रेमी नागरिक, खेळाडू, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयात गुरूपौर्णिमा साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ ला ने.ही. कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे गुरुपौर्णिमा



उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका दलाल मॅडम व शेंडे मॅडम ह्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बनसोड मॅडम यांनी केले. त्यांनी गुरुची महिमा, महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यानंतर वर्ग ७ वीच्या विद्यार्थ्यांनी गुरुवंदना 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा' हे सुमधुर गीत केले. कु. सृष्टी सहारे या विद्यार्थ्यांनी गुरु बद्दल खूप सुंदर मनोगत व्यक्त केले. कु. भार्गवी मदनकर या विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर केलं. दलाल मॅडम यांनी गुरुचे विद्यार्थ्यांच्या जीवनात काय महत्त्व आहे हे समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका आदरणीय बनपूरकर मॅडम यांनी गुरु बद्दलचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुरे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन उंदीरवाडे मॅडम यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक शिक्षिका आणि तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

❁❁❁❁❁❁

# रोशना मस्के यांना आचार्य पदवी

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील ने.हि. महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थिनी रोशना मस्के यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने 'आचार्य पदवी' नुकतीच प्रदान केली. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'सिंथेसिस अँड कॅरेक्टरायझेशन ऑफ इनऑरगानिक फॉस्पर फॉर एसएसएल अप्लिकेशन बाय युजिंग वेट केमिकल मेथड अँड कम्बंशन' हा होता. त्यांनी डॉ. अतुल येरपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोंडवाना विद्यापीठाला प्रबंध सादर केला होता.



या संशोधन प्रवासात त्यांनी प्रतिष्ठित स्कोपस-इंडेक्स जर्नल्समध्ये १० शोधनिबंध प्रकाशित केले. संशोधन कार्य करीत असतांना महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एस.एम. शेकोकर, डॉ. एन.एस. कोकोडे, डॉ. डी.एच. गहाणे, डॉ.रतन मेश्राम, प्रा. डी.एम परशुरामकर, विलास खोब्रागडे व रोशन डांगे यांनी वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले. आचार्य पदवी मिळाल्याबद्दल रोशना मस्केंनी आई, वडील, पती आणि कुटुंबातील सर्व सदस्यांचे व गुरुजनांचे आभार मानले आहे.

# अभाविप ब्रम्हपुरीची नगर कार्यकारिणी घोषित



ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय विद्यार्थी दिवस तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापना दिना निमित्त यशवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सत्कार करण्यात आला तसेच अभाविप ब्रम्हपुरीची नूतन नगर कार्यकारिणी घोषित करण्यात आली. विठ्ठल रुक्मिणी या सभागृहात हे कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने चंद्रपूर विभाग राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे संघ चालक, प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले अभाविप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य वैदेही मुडपल्लीवार, जिल्हा प्रमुख प्रा.डॉ. कुलजीत कौर गिल, अभाविप जिल्हा सह संयोजक सविता सरकार, अभाविप प्रांत सचिवालय सचिव रितिक जी कानोजिया, अभाविप ब्रम्हपुरी नगर विस्तारक जय टोंगे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा प्रामुख प्राध्यापिका डॉ. कुलजीत कौर गिल यांनी ब्रम्हपुरी नूतन नगर कार्यकारिणी घोषणा केली. त्यामध्ये नगर मंत्री कल्याणी मानगुळदे, नगर सह मंत्री अंकित मेश्राम, सचिन नंदनवार, अंबिका नाकतोडे, यशस्वी ठाकरे, नगर कार्यालय मंत्री कार्तिक चुकाबोटलावार, नगर कोष प्रमुख मोहित कावळे, नगर सोशल मीडिया संयोजक शिल्पा सरकार, नगर मीडिया संयोजक संस्कृती राऊत, एस.एफ.डी. संयोजक नीलिमा गेडाम, एस.एफ.एस. संयोजक तन्मय पिपरे, नगर राष्ट्रीय कला मंच संयोजक नंदिनी तुम्मे, नगर खेलो भारत संयोजक गौरी पेल्लारवार, नगर कार्यकारिणी सदस्य कल्याणी सुखदेवे, पुजा मेश्राम, धनश्री शेंडे, राजकुमार गेडाम, सविता सरकार, जय टोंगे, प्रा. धर्मेंद्र मुनघाटे, राहुल श्यामकुवर आदींचा समावेश आहे.

तसेच राष्ट्रीय विद्यार्थी दिवसा निमित्य अखिल भारतीय विद्यार्थी परिषद गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम राबवत असते. या वर्षी देखील हार्दिक सोहळा ९ जुलै ला ब्रम्हपुरी नगरात राबवण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## डॉ. आंबेडकर विद्यालयात वृक्षारोपण

ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम विद्यालयाच्या परिसरात नुकताच पार पडला. या उपक्रमात १५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. राजेश कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून मनिष नागदेवे होते. वृक्षारोपणात विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.डब्ल्यू. नन्नावरे, पर्यवेक्षिका शेळके, तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, स्काऊट गाईड पथकाने सहभाग घेतला.

# होमिओपॅथी डॉक्टरांच्या CCMP नोंदणीला आयएमएच्या तीव्र विरोध

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासनाने १५ जुलै २०२५ पासून लागू होत असलेल्या एका नव्या आदेशानुसार, ज्या बी.एच.एम.एस (होमिओपॅथी) डॉक्टरांनी सीसीएमपी (Certificate Course in Modern Pharmacology) नावाचा एक वर्षाचा ब्रिज कोर्स पूर्ण केला आहे, अशा डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये केली जाणार आहे. या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र राज्याने जोरदार आवाज उठवला आहे. हा निर्णय सामान्य जनतेच्या आरोग्याशी थेट खेळ करणारा, अन्यायकारक व अत्यंत धोकादायक असल्याचे आयएमएचे म्हणणे आहे.



बी.एच.एम.एस डॉक्टरांसाठी तयार करण्यात आलेला सीसीएमपी कोर्स हा केवळ १ वर्षाचा ब्रिज कोर्स आहे, ज्यामध्ये फार्माकॉलॉजी आणि मेडिसिनसारख्या विषयांचे फक्त प्राथमिक शिक्षण दिले जाते. IMA च्या मते, हा कोर्स एम.बी.बी.एस. च्या ५.५ वर्षांच्या सखोल अभ्यासक्रमाच्या तोडीचा अजिबात नाही. जर या कोर्सधारकांना मॉडर्न मेडिसिन प्रॅक्टिशनर मान्यता दिली गेली, तर सामान्य रुग्ण भ्रमित होतील. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, योग्य निदान, औषधांचे अचूक प्रमाण, सर्जरीसंबंधी ज्ञान या सर्व बाबतीत अपुरे शिक्षण असलेल्या डॉक्टरांकडून उपचार केल्यास रुग्णाच्या जीवाला धोका होण्याची शक्यता आहे.

सदर माहिती ब्रह्मपुरी येथील आयएमए हॉलमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी आयएमए ब्रह्मपुरीचे अध्यक्ष डॉ. भारत गणवीर, सचिव डॉ. सतीश दोनाडकर, सहसचिव डॉ. निकेश खोब्रागडे, डॉ. अरविंद नाकाडे, डॉ. राव, डॉ. मिनू गणवीर, डॉ. वर्षा नाकाडे, डॉ. म्हैसकर, डॉ. अंजली वाडेकर उपस्थित होते.

**नियमित वाचा ब्रम्हपुरी समाचार**

# महसूलमंत्री नाम. बावणकुळेंच्या निर्णयाचे स्वागत

ब्रह्मपुरी/का.प्र.

मागील सरकारने १२ जुलै २०२१ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार शेतजमिनीचे व्यवहार करताना जिरायतीसाठी किमान २० गुंठे आणि बागायतीसाठी दहा गुंठे इतके प्रमाणभूत क्षेत्र बंधनकारक ठरविले होते. यामुळे एक, दोन, तीन गुंठ्यांमध्ये जमिनी विकत घेणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना व नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. या तुकडेबंदी कायद्याच्या रद्दबातल करण्याच्या निर्णयामुळे शेतजमिनीच्या खरेदी विक्री व्यवहाराला नवी दिशा मिळणार असून अनेक छोटे शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाबद्दल भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे राज्याचे महसूल मंत्री झाल्यानंतर त्यांनी लोकहिताचे अनेक निर्णय घेतलेले आहे. हा तुकडेबंदी कायदा रद्द करण्याच्या घोषणेमुळे राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील लाखो शेतकरी व ग्रामीण भागातील प्लॉट धारक यांना दिलासा मिळणार आहे या संदर्भात पंधरा दिवसात एस ओ पी म्हणजे प्रक्रिया पद्धत निश्चित केली जाणार आहे. एसओपी तयार करण्यासाठी महसूल, नगर विकास व जमाबंदी आयुक्त या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित केली जाणार आहे आणि यामुळे राज्यातील सुमारे ५० लाख कुटुंबांना फायदा होईल असे दिसून येत आहे. लोकहिताच्या या निर्णयामुळे शेतकरी व प्लॉट धारक यांना खूप दिलासा मिळाला आहे, त्यामुळे जनतेच्या वतीने प्रा. बगमारे यांनी महसुल विभागाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# ब्रम्हपुरीच्या तनया गेडामची वर्ग २ राजपात्रित अधिकारी म्हणून निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.



तनया राजेश गेडाम, रा. ब्रम्हपुरी हिची राज्यसेवा २०२३ अंतर्गत घेण्यात आलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परिक्षेत प्रथम प्रयत्नात २२ व्या वर्षी कोणताही कोचिंग क्लॉस न लावता सहाय्यक अभियंता वर्ग २ (राजपत्रित) पदावर निवड झाल्याबददल तिचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

तनया गेडाम हीने १० वी पर्यंतचे शिक्षण हिंदू ज्ञान मंदिर ब्रम्हपुरी येथून व १२ वी डॉ.आबेडकर कॉलेज ब्रम्हपुरी येथून पास केले असुन १० व १२ वी मध्ये ती तालुक्यातून प्रथम आली होती. पदवी परिक्षा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथुन उत्तीर्ण केली आहे. तसेच ती सद्या व्हि. एन. आय. टी. कॉलेज नागपूर येथुन एम. टेक करीत आहे. तिला डॉ. आबेडकर राष्ट्रीय मेरीट स्कालरशीप १२ वी करिता मिळाली तसेच धीरुभाई अंबानी स्कालरशीप बीटेक ४ वर्षाकरीता मिळाली आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आपले आई वडील व गुरुजनांना दिले आहे.

❁❁❁❁❁❁❁

# अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट



ब्रह्मपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या चांगल्या भविष्यासाठी गंभीर व्हावे तसेच त्यांनी शासन प्रशासनात मोठी भागीदारी निर्माण करावी यासाठी दिव्यदीप फाऊंडेशनकडून ज्ञानवाहिनी अभ्यासिका हळदाला विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पुस्तके त्यांच्या मागणीनुसार भेटस्वरूपाने देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हळदाचे सरपंच दौलत गरमळे, तर प्रमुख अतिथी म्हणून संजय लोणारे, लुमदेव खेवले, ज्ञानेश्वर झरकर, धनराज राऊत, सचिन बदन तसेच दिव्यदीप फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. स्निग्धा कांबळे आदींची उपस्थिती होती.

हळदा येथील ज्ञानवाहिनी अभ्यासिका निर्माण करणारे लोक ही कर्तबगार माणसे असून, त्यांचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी संजीवनीच उपलब्ध करून दिली. ग्रामीण विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचं सोनं करावं, असे आवाहन डॉ. स्निग्धा कांबळे यांनी केले. तसेच तळागाळातील सर्वांसाठी काम करणे हा दिव्यदीपचा उद्देश असून, त्या अन्वये आम्ही हा उपक्रम राबवत आहोत, असेही मत मांडले.

शासनाच्या योजनांचा लाभअभ्यासिकेसाठी मिळवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले. ज्ञानेश्वर झरकर यांनी, हळदा गावातील अभ्यासिका भविष्यात वटवृक्षात रूपांतरित होईल, अशी आशा दौलत गरमळे यांनी व्यक्त केली. संजय लोणारे व लुमदेव खेवले यांनी गावविकासासाठी सदैव तत्पर राहण्याची ग्वाही दिली. धनराज राऊत यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती रूपेश काळबांधे यांनी आपल्या मनोगतातून दिली. प्रफुल्ल टेंभुर्णे यांनी अभ्यासाची भूक आणि पुस्तकांचे आयुष्यातील महत्त्व विषद करत विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. संचालन व आभार मंगेश नंदेश्वर यांनी केले. यावेळी दिव्यदीपचे सदस्य नरेश रहाटे, संजय बिंजवे उपस्थित होते.

# तळोधी खु. येथे जनावरांचे लसीकरण



ब्रह्मपुरी/का.प्र.

जि.प. चंद्रपूर जिल्हा व ब्रह्मपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पशुवैदकीय दवाखाना श्रेणी-२ गांगलवाडी वतीने तळोधी (खुर्द) येथे रविवार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी जनावरांचे व शेळीचे लंम्पि, घटसर्प, एकटांग्या व ETV या रोगाचे लसीकरण करण्यात आले.

या लसीकरणास डॉ. राजेंद्र पुरी तालुका पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती ब्रम्हपुरी व डॉ. देवानंद बागडे, डॉ. मालता दोनाडकर, डॉ. रविराज वडतकर या चमुने शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन जनावराचे लसीकरण केले व ही मोहीम यशस्वी पार पडली.

❁❁❁❁❁❁❁

# शिवरायांची १२ किल्ले युनोस्कोच्या यादीत ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब - प्रा. देशकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

संपूर्ण देशवासियांचे आराध्य दैवत रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वैभव असलेले बारा किल्ले हे युनोस्कोच्या ‘जागतिक वारसा यादीत’ ’अद्वितीय वैश्विक मूल्य’ म्हणुन त्यांचा समावेश करण्यात आला आहे.



महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी असे बारा किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत करण्यात आला असून महाराष्ट्रातील रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खान्देरी आणि तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे. ही महाराष्ट्रासाठी आनंदाची, अभिमानाची आणि ऐतिहासिक बाब असून या किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला असल्यामुळे हा महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण असल्याचे प्रतिपादन माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी केले. सोबतच राज्यातील फडणविस, शिंदे, पवार सरकार आणि केंद्रातील मोदी सरकार यांचे अभिनंदन केले.

# विद्युत तारेच्या स्पर्शाने गर्भवती म्हशीचा मृत्यू

## उदापूर-बोरगांव रोडजवळील घटना



ब्रम्हपुरी/का.प्र.

बोरगाव येथील शेतकरी शिवराम ठाकरे यांनी आपल्या मालकीची म्हैस चराईसाठी बोरगाव ते उदापूर रोड जवळील मोरे गॅस एजन्सीच्या गोदाम जवळील लेआउट मध्ये चराईसाठी नेली होती. लेआऊटमधील जागेत विद्युत खांब कोसळून जीवंत प्रवाह चालू असलेल्या विद्युत तारेला म्हशीचा स्पर्श झाल्याने करंट लागून मृत्यू झाल्याची घटना शनिवार दिनांक १२ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली.

ब्रह्मपुरी तालुक्यात दोन-तीन दिवसा अगोदर मोठ्या प्रमाणात पाऊस पडला व अतिवृष्टी झाली. त्याच पावसात लेआउट च्या जागेत असलेले दोन्ही विद्युत खांब खाली कोसळले. ही बाब विद्युत विभागाच्या लक्षात आलीच नाही. बोरगाव येथील शेतकरी शिवराम ठाकरे यांनी म्हशी चराई करता नेहमीप्रमाणे खाली जागेत आणल्या. अचानक म्हशीला विद्युत करंट लागल्याने तडफडत असल्याचे शिवराम यांच्या लक्षात आले. म्हशीला करंट लागून मृत झाल्याची माहिती गावातील कवडूजी पिंपळकर यांना दिली. पिंपळकर यांनी वेळीच विद्युत कर्मचाऱ्यांना व पोलिसाना घटने संदर्भात माहिती दिली असून पोलिसांनी पंचनामा केला आहे. पशुसंवर्धन विभागाचे वैद्यकीय शल्य चिकित्सक डॉक्टर किशोर पराते यांनी शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण केली. म्हशीचा मृत्यू झाल्यामुळे शिवराम ठाकरे यांचे अंदाजे एक लाख रुपये नुकसान झाले आहे. विद्युत वितरण कंपनीने त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

# वीज कर्मचाऱ्यांची जीगरबाज कामगिरी

## पूराच्या पाण्यात बोटीतून जात वीज पुरवठा सुरळीत केला

ब्रह्मपुरी/का.प्र.

गांगलवाडी क्षेत्रातील बरडकिन्ही गावातील वीज खंडित झालेली होती. तिला पूर्ववत करण्यासाठी पुराच्या पाण्यातून प्रवास करीत वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी विद्युत कर्मचाऱ्यांनी पूर सदृश्य परिस्थितीतही बोटच्या साह्याने पाण्यातून मार्ग काढत मोठ्या प्रमाणात धाडस दाखविले व वीज पुरवठा सुरळीत केला.

सध्या सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल होत असून त्या कर्मचाऱ्यांच्या धाडसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. खरंतर ब्रह्मपुरी तालुक्यात मागील आठवडयात सर्वत्र पावसाची संततधार सुरू होती. एवढेच नव्हे तर वैनगंगा नदीला पूर आलेला होता. काही ठिकाणी विद्युत पावर हाऊस मध्ये पुराचे पाणी घुसलेले होते. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे अन्य ठिकाणी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करण्याची जबाबदारी विद्युत कर्मचाऱ्यांची असल्यामुळे जीव मुठीत घेऊन धोका पत्करण्याची वेळ कदाचित येईलच अशी शक्यता होती.

असाच प्रसंग शाखा गांगलवाडी येथील महावितरण विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांना अनुभवायला मिळाला. गुरुवार दिनांक १० जुलै २०२५ रोजी बरडकीन्ही गावातील विद्युत वाहिनी पाण्याखाली आल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. मात्र सर्वत्र पुराचे पाणी असल्याने कर्मचाऱ्यासमोर वेळेत विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी अडचण निर्माण होत होती. विद्युत अधिकाऱ्यांनी वेळीच प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन समितीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून बोट्स उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. वेळीच बोटस् उपलब्ध होताच सुरज खोब्रागडे, सचिन चहांदे, आकाश नखाते, बोंडे, व अन्य विद्युत कर्मचाऱ्यांनी बोटच्या साह्याने पाण्यातून ‘रिक्स’ घेऊन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करीत वीज पुरवठा सुरळीत केल्यामुळे या जिगरबाज विद्युत कर्मचाऱ्याच्या कार्याची सर्वत्र प्रशंशा होत आहे.

# वंचित बहुजन महिला आघाडीचे विविध मागण्यांचे निवेदन

## मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा




ब्रम्हपुरी/का.प्र.

वंचित बहुजन महीला आघाडी ब्रम्हपुरी द्वारे येथील उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनामध्ये २०१९ मध्ये नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पन्नास हजार पर्यंतचे अनुदान जमा झाले. मात्र काही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेच नाहीत ते अनुदान तातडीने जमा करण्यात यावे, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना नुकसान भरपाई त्वरित देण्यात यावी, वीज मंडळाचे खाजगीकरण करण्यात येऊ नये, पावसाळयाच्या कालवधीत ब्रम्हपुरी शहरात विविध वॉर्डांमध्ये रस्त्याचे खोदकाम व दुरूस्तीचे काम सुरू आहे. या कामामुळे अनेक ठिकाणी पाईपलाईन फुटल्या आहेत, या कारणामुळे नागरिकांचे घरघुती पाणीपुरवठा यंत्रणा व बाथरूम व इतर संरचनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, याची भरपाई देण्यात यावी.

सदर मागण्या ताबडतोब पुर्ण कराव्यात अन्यथा वंचित बहुजन महीला आघाडीचे वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा लिना रामटेके वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा महिला उपाध्यक्षा यांनी निवेदनातून दिला. यावेळी लता मेश्राम, चंदा माटे, विद्या बागडे, प्रतीमा डांगे, निरूपा खोब्रागडे, करूणा मेश्राम, शिला निहाटे, अनुपमा जनबंधु, विश्रांती रामटेके, विजया खोब्रागडे, रेखा सोन्डवले व महिला कार्यकर्त्यां उपस्थित होत्या.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: अंक व जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३७५

नियमित वाचा.. अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

**... QUOTES ...**

“If you take out the team in teamwork, it's just work. Now who wants that.”
- Matthew woodring stover

**चारोळी**

तुझ्यापेक्षा बायकोच्या प्रेमाचा
हक्क मी अधिक मानतो...
हे तुझ्या रूसण्याचे कारण नको,
आयुष्यातही मी प्रोटोकॉल पाळतो...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे तालुका मैदानी क्रिडा फुटबॉल स्पर्धेत घवघवीत यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रिडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा परिषद चंद्रपूर द्वारे आयोजित तालूका स्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेमध्ये १४ ते १६ वर्षीय वयोगटातील मुलांच्या मैदानी स्पर्धेत एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

तालूका स्तरीय सुब्रतो फुटबॉल विभागीय स्पर्धा चंद्रपूर येथे दिनांक ११ जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी ०-५गोलनी श्री. महर्षी विद्या मंदीर चंद्रपूरच्या चमूवर विजय प्राप्त केले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल एल.एम.बी. पब्लिक स्कुलचे अध्यक्ष तथा ने.भै.हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका मॅडम, पर्यवेक्षिका यांचेसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रिडा शिक्षक विशाल सर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# करवाढीमुळे मद्यपी विदेशीकडून...

(पान क्र. १ वरून)

तुलना होते. परिणामी, अनेक तळीराम आजकाल देशी दारूकडे वळताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत देशी दारूच्या विक्रीत काही प्रमाणात वाढ झाल्याचे काही देशी दारू दुकान चालकांनी सांगितले.

**दारूची आंतरराज्य तस्करी होण्याचा धोका !**

विदेशी दारूच्या वाढीव दराचा विचार करता महाराष्ट्राच्या तुलनेत कर्नाटक आणि गोव्यातील दारूच्या किमती जवळपास निम्म्यावर आहेत. त्यामुळे इथल्या दरवाढीमुळे आंतरराज्य दारू तस्करीला चालना मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आजही सीमावर्ती भागातून मोठ्या प्रमाणात हुबळी आणि गोवामेड दारूची मोठ्या प्रमाणात तस्करी चालते. सीमाभागात शासनाचे चेकपोस्ट असूनही या तस्करीला आळा बसू शकलेला नाही. आता भविष्यात ही तस्करी अधिक जोमाने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कर वाढणार की घटणार?**

शासनाने विदेशी दारूवरील करवाढ करताना या कर वाढीतून जवळपास १४ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरलेले आहे; पण दरवाढीनंतर राज्यातील बहुतांश बारमधील विदेशी दारूचा खप २५ ते ४० टक्क्यांपर्यंत कमी होत असल्याचा बार चालकांचा दावा आहे. त्यामुळे या नवीन कर वाढीमुळे शासनाचे दारूपासूनचे उत्पन्न वाढण्याऐवजी कमी होण्याची आशंका बार चालकांमधून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांश बार चालकांनी या वाढीव करवाढीला विरोध केला आहे.

# ट्रकच्या धडकेत म्हैस किरकोळ जखमी मात्र, ड्रायव्हरला बेदम मारहाण

ब्रम्हपुरी/का.प्र.


ब्रह्मपुरी येथून नागपूरकडे जाणाऱ्या ट्रकने म्हशीला धडक दिल्याची घटना दिनांक १३ जुलै २०२५ ला रविवारी दुपारी १ वाजता देलनवाडी मधील जयस्वाल बारसमोर घडली. म्हशीला धडक लागल्याचा राग अनावर झाल्याने गुराख्याने ट्रक चालकाला अमानुष मारहाण केली. मारहाणीत ट्रक चालकाच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाल्याने रुग्णवाहिका बोलावून त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी आरोपी गोपीचंद विखार रा. कुरझा याला अटक केली आहे. सदर घटना रविवारी दुपारी १ वाजता ट्रक नागपूरकडे जात असताना रस्त्यावरील म्हशीला ट्रकची धडक बसली. यात दोन म्हैस किरकोळ जखमी झाल्या. मात्र, म्हशीला धडक बसल्याचे पाहून गोपीचंद विखार रा. कुरझा याने ट्रक चालकाला खाली उतरवून अमानुष मारहाण केली. मारहाणीत ट्रक चालक गंभीर जखमी झाला आहे, रुग्णवाहिकेत काही तरुणांनी जखमीला टाकून रुग्णालयात पाठविले. त्याच्यावर नागपूर येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पानठेल्याची जाळपोळ...

(पान क्र. १ वरून)

आरोपीविरोधात गुन्हा नोंदविला. प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ११ जुलै रोजी पारडगाव येथील नीलेश अनिल ढोरे, विनय चंद्रगुप्त मेश्राम यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली. यावेळी पोलिसांनी कसून चौकशी केली असता, दोघांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. गुन्ह्याच्या तपासा दरम्यान नोंदविण्यात साक्षीदारांचे बयाण तासात गुन्हा केल्याचे सांगितल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.


Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा संलग्नित
रयत बहुउद्देशिय शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित
गंगाबाई तलमले महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान) ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर
- पाहिजेत -

| अ.क्र. | शाखा | विषय |
|---|---|---|
| १. | कला | इंग्रजी, मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, भुगोल, अर्थशास्त्र, इतिहास |
| २. | वाणिज्य | वाणिज्य |
| ३. | विज्ञान | वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित |

वरील विषयांकरीता घडयाळी तासिकेप्रमाणे सहाय्यक अधिव्याख्याता या पदांकरीता यु.जी.सी. महाराष्ट्र शासन व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या नियमावलीनुसार शैक्षणिक अर्हता प्राप्त इच्छुक उमेदवारांनी रविवार, दि. २७ जुलै २०२५ पर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये किंवा महाविद्यालयाच्या (gtalmalecollege@gmail.com) ई-मेलवर आवश्यक कागदपत्रांसह आवेदन सादर करावेत, अर्जाची छाननी करून योग्य उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीला बोलावण्यात येऊन निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

प्राचार्य
गंगाबाई तलमले महाविद्यालय,
अलंकार टॉकीजच्या बाजूला, आरमोरी रोड, ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर
मोबाईल नं. 9420868415

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404